पुढारी



कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेतील शिवाजी विद्यापीठ विरुद्ध गणपत विद्यापीठातील लढतीचा एक क्षण.

# शिवाजी विद्यापीठाचा सलग दुसरा विजय

**पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ फुटबॉल**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जबलपूर (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने सलग दुसरा विजय मिळवत आगेकूच केली. मंगळवारच्या सामन्यात मेहसाना (गुजरात) येथील गणपत विद्यापीठाचा ६ विरुध्द १ अशा गोलफरकाने एकतर्फी पराभव केला.

सामन्यात संदेश कासारने २, अभिषेक शिर्के, संकेत मेढे, रोहित पोवार, निरंजन कामते यांनी प्रत्येकी एक गोलची नोंद केली. सोमवारच्या सामन्यात शिवाजी संघाने जागरण लेक सिटी विद्यापीठ, भोपाळ संघाचा ३ गोलने पराभव केला होता. दरम्यान, बुधवारी (दि. २१) शिवाजी विद्यापीठाचा सामना महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर या संघाशी होणार आहे.

पुढारी



# हॅण्डबॉल स्पर्धेत न्यू कॉलेजला सलग २१ वर्षे अजिंक्यपद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय हॅण्डबॉल स्पर्धेत सलग २१ व्या वर्षी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेजने अजिंक्यपद पटकाविले. संघाला चेअरमन के. जी. पाटील, व्हा. चेअरमन डी. जी. किल्लेदार, प्रा. अमर सासने यांचे मार्गदर्शन लाभले. बक्षीस समारंभ शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आर.डी. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, डॉ. श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी सुनील पाटील, विश्वास सावंत, संदीप पाटील, दत्तात्रय भोपळे आदी उपस्थित होते.

21 DEC 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

पु. डॉ. व्ही.एन. शिंदे

# बाळांचा कारखाना!

प्लेटो हा ग्रीसमधील महान तत्त्ववेत्ता. त्याने सांगितलेले तत्त्वज्ञान आजही अभ्यासले जाते. ख्रिस्तपूर्व ४२३ ते ४२७ या कालखंडातला त्याचा जन्म. त्याने आपल्या 'दि रिपब्लिक' या पुस्तकात साम्यवादाची मांडणी केली. मात्र, ती आर्थिक नव्हती; समाजव्यवस्थेबद्दल होती. त्याने राज्यकर्ते आणि सैनिकांसाठी कुटुंबव्यवस्था आणि संपत्तीचा हक्क नाकारला होता. त्याच्या मते सुदृढ, निरोगी आणि बुद्धिमान प्रजेसाठी स्त्रीने तिला सुयोग्य वाटेल अशा सुदृढ, सशक्त, बुद्धिमान पुरुषाबरोबर संबंध ठेवून मूल जन्माला घातले पाहिजे, तरच सुदृढ, हुशार समाज निर्माण होईल. अर्थातच कुटुंबव्यवस्था मोडीत काढणारी ही मांडणी स्वीकारली गेली नाही. प्लेटोची आज आठवण येण्याचे कारण म्हणजे जैवतंत्र संशोधक आणि चित्रपट निर्माते हाशम अल-घायली यांनी प्रसृत केलेला व्हिडीओ आणि त्यांनी मुलांच्या जन्माबद्दल केलेली विधाने!

अल-घायली यांच्या घोषणेनुसार आता बाळ जन्माला घालताना महिलांना आपल्या पोटात गर्भ वाढवण्याची आवश्यकता नाही. बाळंतपणामध्ये होणाऱ्या यातनांपासून महिलांची सुटका होईल. कारण बाळ कारखान्यामध्ये जन्माला येईल. अर्थात १९९९ मध्ये आलेल्या 'मॅट्रीक्स' चित्रपटामध्ये कारखान्यात बाळ जन्माला येते असे दाखवले होते. त्यावेळी या चित्रपटाचे विज्ञान कथा म्हणून कौतुक झाले. महाभारतातही १०० कौरवांचा जन्म अशीच कथा सांगतो. मात्र, निसर्ग नियमाविरुद्ध असे काही घडणार नाही, असे संशोधकांचे मत होते. तथपि, आता जर्मनीतील बर्लिनमधील संशोधक अल-घायली हे सर्व शक्य असल्याचे सांगत आहेत. ते स्वतः जैवतंत्रज्ञ आहेत. त्यांनी 'इक्टोलाईफ' नावाची कंपनी स्थापन केली आहे. या कंपनीच्या जगभरात ७५ शाखा आहेत. प्रत्येक शाखेत ४०० बेबी पॉड असतील. त्यात बाळाची वाढ करून मुले जन्माला येतील. एका वर्षात ३० हजार मुले जन्माला घालण्याची याची क्षमता असणार आहे. बेबी पॉड हे एक यंत्र आहे. त्याची रचना गर्भाशयाप्रमाणे आहे. त्याला कृत्रिम गर्भाशयही म्हणतात. गर्भ वाढत असताना गर्भाला नाळेद्वारे आईच्या शरीरातून पोषक तत्व आणि ऑक्सिजन मिळतो. गर्भाशयात असणारे वातावरण आणि यंत्रणा बेबी पॉडमध्ये आहे. ज्यांना बाळ होत नाही, त्यांच्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त असल्याचे अल-घायली सांगत आहेत.

पुरुषाचे शुक्राणू आणि स्त्रीचे अंडबीज एका यंत्रामध्ये घुसळले जातील. दहा दिवसांनंतर त्याचे गर्भात रूपांतर होते. ऊतीचे गर्भात रूपांतर होण्याची आईच्या गर्भाशयात एक नैसर्गिक प्रक्रिया असते. हे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी संशोधक सध्या कार्य करत आहेत. त्यानंतर बेबी पॉड गर्भाशयासारखे कार्य करू लागेल. बेबी पॉडचे संवेदक बाळाची वाढ कशी होते, यावर नियंत्रण ठेवतील. त्याद्वारे ऑक्सिजन, रक्तदाब, श्वासोच्छ्वासाची गती, हृदय, मेंदू, मूत्रपिंड, यकृत आणि एकूण शरीराची वाढ कशी होते हे तपासता येईल. स्त्रीच्या गर्भाशयात असणारे अमिनोओटिक द्रवही बेबी पॉडमध्ये असेल. नऊ महिने बाळाची वाढ झाल्यानंतर त्याला बाहेर काढण्यात येईल. अल-घायली यांच्या मते हे तंत्रज्ञान इतके प्रगत आहे की, आता आपल्याला हवे आहे तशा प्रकारचे बालक बनवणे शक्य आहे. मुलाची बुद्धिमत्ता, उंची, केस, डोळ्यांचा आणि त्वचेचा रंग, शक्ती जशी पाहिजे तशी असणारे बाळ जन्माला घालता येऊ शकेल. त्याने कोणत्या क्षेत्रात जावे, हेही बाळ जन्माला घालण्यापूर्वी ठरवता येईल. ज्या देशात लोकसंख्या घटत आहे अशा जपान, बल्गेरिया देशांना हे तंत्रज्ञान वरदान असल्याचे संशोधकांचे मत आहे. ज्यांना आपल्या बाळाची वाढ कशी होते हे कारखान्यात येऊन पाहता येणे शक्य नाही, ते बेबी पॉड घरी नेऊ शकतात. मात्र, त्याला नऊ महिने अखंड विद्युत पुरवठा असणे आवश्यक आहे. सर्व प्रकारच्या चाचण्यांनंतरच बाळ वाढवण्याची प्रक्रिया सुरू होते. त्यामुळे गुंतागुंतीच्या या प्रक्रियेतून सुदृढ निरोगी बाळच जन्माला येईल. अल-घाईली यांच्या दाव्यानुसार ही कृती प्रत्यक्षात येण्यासाठी केवळ ऊतीचे गर्भात रूपांतर करण्याचे तंत्रज्ञान आणि प्रतिजैवके निर्माण करण्याचे तंत्रज्ञान विकसित होणे बाकी आहे. त्यानंतर या कारखान्यातून मुलांना तयार करता येऊ शकेल. कोणाला क्रिकेटर, राजकीय नेता, अभियंता, संशोधक हवा असेल, तर तसे बाळ बनवण्यापूर्वी जनुकांमध्ये त्या दृष्टीने सुयोग्य बदल करता येतील. जगभरातील अनेक संशोधकांनी काही दिवसांतच अशा प्रकारे बाळ तयार करणे शक्य असल्याचे मान्य केले आहे. किंग्ज कॉलेज, लंडनमधील वैद्यकशास्त्राचे प्राध्यापक अँड्र्यू शेनॉन यांच्या मते, 'वाढ पूर्ण होण्यापूर्वी जन्मलेल्या बाळाला आपण इनक्युबेटरमध्ये ठेवून त्याचे संगोपन करतो. या तंत्रात त्याही अगोदरपासून बाळाची वाढ केली जाणार आहे, हे शक्य होणार आहे.' यापूर्वी प्राण्यांवर केलेल्या प्रयोगात यश मिळाले असल्याने संशोधकांना या तंत्रज्ञानाबद्दल खात्री वाटते.

मात्र, या तंत्रज्ञानामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होणार आहेत. मुळात असे बाळ घरी आणणे म्हणजे बाळाला दत्तक घेतल्यासारखे आहे. पोटात गर्भ वाढताना एका स्त्रीचे आईत आणि पुरुषाचे बापात रूपांतर होत असते आणि सुरवंटाचे फुलपाखरू व्हावे इतके ते सुंदर असते. पोटातील बाळाची वाढ आई म्हणून स्त्रीला सुखावत असते. त्याच्या हालचाली, त्याचा आकार हा तिच्या अनुभवण्याचा, आनंदाचा भाग असतो. प्रसववेदना सहन करून जन्माला घातलेल्या बाळाला ती प्राणापलीकडे जपत असते. या भावना तितक्याच तीव्रतेने कारखान्यातून बेबी पॉडमध्ये वाढवलेले बाळ घरी घेऊन आलेल्या आईच्या मनात असतील का? समजा, तेंडुलकरसारखे १०० क्रिकेटर एकाचवेळी तयार झाले, तर निवड कोणाची करायची? प्लेटो केवळ राज्याचा विचार करत होता. म्हणूनच त्याचे ते तत्वज्ञान समाजाने मान्य केले नाही. मात्र, आता विज्ञानाच्या सहाय्याने पुन्हा हेच तत्त्वज्ञान एखादा भांडवलशहा, हुकुमशहा लादू शकेल. वाटचाल तर त्याच दिशेने सुरू आहे.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

21 DEC 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यसबा करंडक चाटे शिक्षण समूहाकडे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूरचे सुपुत्र, चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या चौथ्या स्मृती दिनानिमित्त भालकर फौंडेशनतर्फे आयोजित पहिला आंतरशालेय कलामहोत्सव करंडक (यसबा करंडक) चाटे शिक्षण समूह यांनी पटकावला. विजेत्यांना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव विलास शिंदे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. हा कलामहोत्सव शिवाजी विद्यापीठ वि. स. खांडेकर भाषा भवन येथे पार पडला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन नटराज पूजन करून शिवाजी युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. प्रकाश गायकवाड, तसेच माजी प्राध्यापक नंदकुमार रानभरे, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांच्या हस्ते पार पडले.

यसबा करंडक महोत्सवात चित्रकला, निबंध, एकपात्री, समूह नृत्य, समूह गायन या पाच कला प्रकारांमध्ये १५ शाळांच्या जवळपास २९० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. त्याचबरोबर आहिर नृत्य, गौर नृत्य, संबलपुरी नृत्य या सादरीकरणामुळे कार्यक्रमाची उंची वाढली. परीक्षक म्हणून संजय तोडकर, किरण पोटे, गौरी चिले, आलोक जत्राटकर, महेश पाटील, भाग्यश्री कालेकर, महेश हिरेमठ, वेदा सोनुले, व्यंकटेश बिदनूर, मनी पदमन यांनी काम पाहिले. याप्रसंगी अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना भालकर व यसबा करंडकचे संकल्पक संग्राम यशवंत भालकर यांनी आभार मानले. निवेदन अर्चना शिंदे यांनी केले. यसबा करंडक समिती म्हणून भूषण पाठक, आशीष हेरवाडकर, आकाश लिगाडे, शिवम गेजगे, ऋषी कोडनाईक, रितेश सुतार, राहुल जाधव, शताक्षी जोशी, सपना चव्हाण, राजनंदिनी पत्की, श्रुती देशपांडे, वैदेही गाडवे यांनी काम पाहिले.

याप्रसंगी उदय कुलकर्णी, अभिनेते नितीन कुलकर्णी, रेखा यशवंत भालकर, सुनील घोरपडे यांची उपस्थिती होती.